## योजना क्रमांक - २ साठी अर्जाचा नमुना

## अधिकृत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत राज्याचा संघ सहभागी होण्यासाठी राज्य संघटनांना आथिक सहाय्य देणे

## (अर्ज नमुना.)

| अक.क्र | आवश्यक माहिती. | :बाबनिहाय तपशिल |
|---|---|---|
| १ | राज्य संघटनेचे नांव. | : |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता. दुरध्वनी क्र. व ईमेल आय.डी. सह | |
| ३ | खेळ | |
| ४ | राष्ट्रीय स्पर्धेचे नांव | |
| ५ | एकुण खेळाडु संख्या (मुले/मुली) | पृष्ठ. क्र - |
| ६ | संघव्यवस्थापक/ मार्गदर्शक संख्या | पृष्ठ. क्र - |
| ७ | खेळाडुंना कीट वाटप केल्याबाबतची माहिती. जोडली आहे काय.? | वाटप तक्त्यावर खेळाडुंच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.<br>पृष्ठ. क्र - |
| ८ | खेळाडुंना ट्रॅकसुट वाटप केल्याबाबतची माहिती. सोबत जोडली आहे काय? | वाटप तक्त्यावर खेळाडुंच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.<br>पृष्ठ. क्र - |
| ९ | प्रवासखर्च तपशिल- सवलतीच्या दराचे रेल्वे / बस भाडे सोबत जोडले आहे काय? | खेळाडुंचे प्रवास खर्चाबाबत रेल्वे/ एस.टी. (बस) तिकीटे सोबत जोडावी. |
| १० | प्रत्यक्ष स्पर्धा कालावधीसाठी वाटप करण्यात आलेल्या हातखर्ची भत्ता वाटपा बाबतचा तपशील | सोबत हातखर्ची भत्ता वाटपाबाबत तक्ता जोडावा.<br>पृष्ठ. क्र - |
| ११ | गतवर्षी प्राप्त झालेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय? | सोबत जोडणे आवश्यक.<br>पृष्ठ. क्र - |
| १२ | ट्रॅकसुट / कीट खरेदीच्या पावत्या सोबत जोडल्या आहेत काय. | सोबत जोडणे आवश्यक.<br>पृष्ठ. क्र - |
| १३ | राज्य संघटनेस म.रा.क्री.प मान्यता आहे काय? | मान्यता क्रमांक नमुद करावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | **राष्ट्रीय स्पर्धा अहवाल सोबत जोडला आहे काय ?** | | |
| १५ | **अर्जा सोबत सादर केलेले सर्व कागदपत्र सचिवा मार्फत स्वाक्षांकीत केलेल्या आहे काय?** | **होय / नाही.** | |
| १६ | **जिल्हा क्रीडा अधिकारी यांचा तपासणी अहवाल सोबत जोडावा.** | | |

प्रतिज्ञापत्र

मी. -------------------------------------- (नांव) ------------------------(संघटनेचे नांव) प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, या अर्जासोबत अनुदानाबाबत जी माहिती दिली आहे, ती मी संपूर्णपणे वाचली असून त्याप्रमाणे अर्जात भरलेली माहिती खरी आहे. याबाबत सादर केलेली माहिती खोटी किंवा बनावट आढळल्यास मी शासकीय कारवाईस पात्र असेन याची मला जाणीव आहे.

स्थळ :
दिनांक :

राज्य संघटनेच्या सचिवाची स्वाक्षरी

संघटनेचा शिक्का.

५-३

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, १९९६

अधिकृत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत
राज्याचा संघ सहभागी होण्यासाठी
राज्य संघटनांना आर्थिक सहाय्य...

**महाराष्ट्र शासन**

**समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग**

शासन निर्णय क्रमांक राक्रीधो. १०९६/प्र. क्र. ३३०/क्रीयुसे-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक ३१ जुलै १९९७

**वाचा** :-(१) शासन निर्णय क्र. पीएचई. ११८४/३५६५/(८०)/एसवायएस., दिनांक १० सप्टेंबर १९८४.
(१) शासन निर्णय क्र. एएएस. १०८९/१८२९५/सीआर-३००/एसवायएस-१, दिनांक ३० नोव्हेंबर १९८९.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्रातील गुणवान खेळाडूंना विविध खेळांच्या राष्ट्रीय स्पर्धांत राज्याचे प्रतिनिधित्व करणे सुलभ व्हावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने सदरहू योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रवासभाडे, गणवेश व ट्रॅकसूट इत्यादीसाठी देण्यात येणारे अनुदान अल्प स्वरूपाचे होते. त्यामुळे राज्य संघटना व खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले असून अर्थसहाय्यात वाढ करण्याबाबत विविध खेळांच्या राज्य संघटना व खेळाडू यांच्याकडून सातत्याने मागणी येत होती. या सर्व बाबींचा विचार करून राज्याच्या क्रीडा धोरणात या योजनेत सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

या योजनेचे यापूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमित करून परिशिष्टानुसार सुधारित नियमास शासन मान्यता देत आहे.

या योजनेवर होणारा खर्च त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि तो " २२०४, क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ (पाच)(ए) राष्ट्रीय क्रीडा व खेळ याकरिता राज्यसंघाची प्रतिनियुक्ती (२२०४-०२३२) योजनेत्तर " या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र. क्र. ७३८/व्यय-११, दिनांक २२ जुलै १९९७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रमेशचंद्र कानडे,**
सचिव,
महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट

शासन निर्णय क्रमांक राक्रीधो. १०९६/प्र. क्र. ३३०/क्रीयुसे-१

दिनांक ३१ जुलै १९९७.

**नियम : १–शीर्षक.**–या नियमास " अधिकृत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत राज्याच्या संघ सहभागी होण्यासाठी राज्य संघटनांना आर्थिक सहाय्य देण्याबाबतचे नियम " असे संबोधण्यात यावे.

**नियम : २–अंमलबजावणीचा दिनांक.**–हे नियम शासन निर्णयाच्या दिनांकपासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

**नियम : ३–आर्थिक सहाय्यासाठी पात्र क्रीडा प्रकार.**–खाली नमूद केलेल्या क्रीडा प्रकाराच्या अधिकृत राज्य संघटना आर्थिक सहाय्यासाठी पात्र राहतील.

**(१) अॅथलेटिक्स, (२) अॅक्वेटिक्स, (३) आर्चरी, (४)आट्य पाट्या, (५) बॅडमिंटन, (६) बास्केटबॉल, (७) बिलियर्ड्स, (८) बॉलबॅडमिंटन, (९) ब्रीज, (१०) बॉक्सिंग, (११) बॉडी बिल्डींग, (१२) क्रिकेट, (१३) सायकलिंग, (१४)कॅरम, (१५) बुद्धिबळ, (१६) फूटबॉल, (१७) फेसिंग, (१८) जिम्नॅस्टिक्स, (१९) हॅन्डबॉल, (२०) हॉकी, (२१) ज्युदो, (२२) कराटे, (२३) कबड्डी, (२४) खो-खो, (२५) कॅनोईंग-कयाकिंग, (२६) मल्लखांब, (२७) पॉवर लिफ्टिंग, (२८) रायफल शूटींग, (२९) रींग टेनिस, (३०) सॉफ्टबॉल, (३१) शूटींग बॉल, (३२) टेबल टेनीस, (३३) टेनीस, (३४) व्हॉलीबॉल, (३५) कुस्ती, (३६) वेटलिफ्टिंग, (३७) यॉटिंग, (३८) रोलर स्केटिंग, (३९) रोईंग.**
४०) हँडग्लायडींग ४१) सायकल पोलो ४२) स्क्वॅश ४३) तायक्वांदो ४४) [illegible] ४५) सुडो

**नियम : ४–खेळाडू व संघाची निवड.**–राष्ट्रीय स्पर्धेकरिता विविध खेळांचे संघ/खेळाडू यांची निवड संबंधित खेळाच्या अधिकृत राज्य संघटनेद्वारा आवश्यक.

**नियम : ५–खेळाडूंची संख्या.**–राष्ट्रीय स्पर्धेकरिता संबंधित खेळाच्या महासंघाने निश्चित केलेल्या संख्येइतकी खेळाडूंची संख्या व व्यवस्थापक/मार्गदर्शक यांची संख्या आर्थिक सहाय्यासाठी ग्राह्य धरण्यात यावी.

**नियम : ६–आर्थिक सहाय्यासाठी खर्चाच्या ग्राह्य बाबी.**–संबंधित क्रीडा प्रकाराच्या सर्व वयोगटाच्या संघास स्वतंत्रपणे आर्थिक सहाय्य देण्यात यावे. खाली नमूद केलेल्या खर्चाच्या बाबी आर्थिक सहाय्यासाठी ग्राह्य धरण्यात याव्यात.

(अ) प्रवास खर्च-सवलतीच्या दराने दुसऱ्या वर्गाचे रेल्वेचे भाडे किंवा राज्य परिवहन महामंडळाचे सवलतीचे प्रत्यक्ष भाडे.

(ब) हातखर्ची भत्ता.–प्रत्येक खेळाडू व व्यवस्थापक/मार्गदर्शक यांना दरदिवशी प्रत्येकी रुपये ४० (चाळीस) प्रमाणे प्रवास व प्रत्यक्ष स्पर्धेच्या कालावधीसाठी.

(क) खेळाचा गणवेश व स्पोर्टस् कीट.–राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना प्रत्येकी रुपये १५० (एकशे पन्नास).

(ड) ट्रॅकसूट.–राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूस रुपये ५०० (पाचशे) प्रमाणे.

**नियम : ७–गणवेश व ट्रॅकसूट वितरण.**–संबंधित खेळाच्या संघटनेने सहभागी होणाऱ्या खेळाडूंना ट्रॅकसूट व गणवेशाचे वितरण केल्याबाबतची पावती पुढील आर्थिक वर्षाच्या अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**नियम : ८–विनियोग प्रमाणपत्र.**–संबंधित खेळाच्या राज्यसंघटनेस मंजूर केलेल्या आर्थिक सहाय्याचे विनियोग प्रमाणपत्र, लेखापरीक्षित विवरणपत्र पुढील वर्षाच्या आर्थिक सहाय्य मागणी अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**नियम : ९–आर्थिक सहाय्य मंजुरीचे अधिकार.**–संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सदर नियमांचे अधिन राहून आर्थिक सहाय्य मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**नियम : १०–आहरण व संवितरण अधिकारी.**–संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**नियम : ११–शिथिल/बदल करणे.**–वरील नियम शिथिल करणे, अंशतः किंवा पूर्णतः बदल करणे, नवीन खेळ समाविष्ट करणे किंवा वगळणे याबाबतचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.